भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.६०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०८/२०१७

**१) मोबाईल दुकानातील मोबाईलची चोरी . :–**

दिनांक २८/०८/२०१७ चे २१.०० ते २९/०८/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील अनिल मदन चिधालोरे वय ३३ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी याचे क्रिस्नम मोबाईल दुकानाचे लाकडी घडी पट्टयाचे कोणीतरी अज्ञात चोराने कुलप तोडुन आत प्रवेश करुन रॅक मध्ये ठेवलेल नोकीया कपंनी २१६ बी. एस. ब्लॅक ०१ , इंडेक्स ०४ जी ०१, जिओनी पी ०५ एलडब्लु ०१ सीऑक्स ४ जी ०१, मॅक्रोमॅक्स ०२, मोबाईल असा एकुण ३१,४७०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०८/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही शाळेत जाते म्हणुन घरुन निघुन गेली सायंकाळ पर्यत परत न आल्याने फिर्यादीचे गावात व नातेवाईकात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये अल्पवयीन मुलगी असल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम. पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**३) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०८/२०१७ चे १२.०० ते १२.३०वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप क्र. एमएच ३६ एफ ३५३० ही सार्वजनीक रोडवर लोकांच्या जिवीतास व वाहतुकीस अडथडा निर्माण होईल अश्या स्थितीत उभा करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २९/०८/२०१७ चे १०.०० वा. दर यातील मृतक दिगाबर नारायनजी पिकलमुंडे वय ४५ वर्ष, रा. विहीरगाव याने आपले राहते घराचे मधल्या खोलीत स्लॅबचे हुकाला सुती दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी संदीप सुकाराम पिकलमुंडे वय ३८ वर्ष, रा. विहीरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २९/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.